# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 26/09/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील रेल्वे उडान पुला जवळील सातगाव फाटा येथे दिनांक २५/०९/२०२३ चे १४.३० वा. ते १४.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– सतिष लालदेव शाह, वय ३० वर्ष, रा. गजानन नगर हिंगणा रोड एमआयडीसी नागपुर व त्यांचा मित्र **मृतक नामे –विजय बनवारी शर्मा** हा हिरो होन्डा ग्लॅमर मोटार सायकल क्र एम. एच.–४०/ए.एस.–४७६३ ने हिंगणा येथे घरी जाण्याकरीता नागपुर रोडने निघाले असतांना फिर्यादी गाडी चालवित होते व मृतक हा पाठीमागे बसुन होता. तेव्हा बुट्टीबोरी ते नागपुर रेल्वे उडान पुलाजवळील सातगाव फाट्याजवळ एक पाठीमागुन येणाऱ्या अज्ञात कंटेनरचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादीचे ताब्यातील हिरो होन्डा ग्लॅमर मोटार सायकल क्र. एम. एच. –४०/ए. एस. –४७६३ गाडीला पाठीमागुन धक्का मारल्याने फिर्यादी व त्याचे सोबत असलेला मृतक विजय बनवारी शर्मा हा रोडवर पडला व कंटेनरचे मागील चाक त्याचे डोक्यावरून गेल्याने तो जागीच मरण पावला आहे. फिर्यादीला मार लागला नाही व कंटेनर चालक त्याचे वाहन घेवुन पळुन गेला. आरोपी कंटेनर चालक हा फिर्यादीचे मित्राचे मरणास कारणीभूत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४(अ) भादवि. सहकलम १८४, १३४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक खंडारे सा. मो. क्र. ९९२३१५९१५३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर